पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय.
स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यानाजवळ,प्रेमलोक पार्क,
चिंचवड, पुणे-४११०१९फोन नं.- ०२०- २७३५०४४४,
ईमेल आयडी- cp.pcpc-mh@gov.in
फॅक्स क्र. ०२०-२७३५१४४५.

जा.क्र. प्रलि/आस्था-२/पोलीस भरती २०१९/ ८५९१ /२०२१/ पिंचि दि. २२/१२/२०२१

## शारिरीक मोजमाप/ कागदपत्रे पडताळणी/ मैदानी चाचणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा गुणतक्ता

पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे आस्थापनेवरील रिक्त असलेल्या ७२० पदांच्या पोलीस शिपाई भरती- २०१९ च्या अनुषंगाने दिनांक १९.११.२०२१ रोजी पार पडलेल्या लेखी परिक्षेतील अंतिम गुणांनुसार ०१:१० या प्रमाणे पात्र ठरलेल्या एकुण ११५४३ उमेदवारांना पुढील चाचणीकरिता दिनांक १०.१२.२०२१ ते दिनांक २०.१२.२०२१ या कालावधीमध्ये शारिरीक मोजमाप, कागदपत्रे पडताळणी व मैदानी चाचणीसाठी बोलाविण्यात आलेले होते.

सदर प्रक्रियेमध्ये उपस्थित असलेल्या उमेदवारांचे शारिरीक मोजमाप, कागदपत्रे पडताळणी घेऊन प्रथमदर्शनी पात्र ठरलेल्या उमेदवारांची मैदानी चाचणी घेण्यात आली आहे. सदर उमेदवारांची लेखी परिक्षा आणि मैदानी चाचणीमध्ये प्राप्त गुणांची रोल नंबर निहाय यादी सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरची यादी अंतिम नसुन फक्त गुणतक्ता आहे. अंतिम गुणवत्ता यादी ही उमेदवारांनी भरुन दिलेला आवेदन अर्जामधील सामाजिक व समांतर आरक्षणानुसार आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची फेरपडताळणी करुन त्यामध्ये पात्र ठरणा-या उमेदवारांची सविस्तर निवडसुची व प्रतिक्षा यादी यथावकाश प्रसिध्द करण्यात येणार आहे.

या गुणतक्त्यातील फक्त गुणांबाबत उमेदवारांना आक्षेप असल्यास उमेदवारांनी त्यांचा आक्षेप लेखी स्वरुपात दिनांक २२.१२.२०२१ रोजी रात्री १०:०० वा. पासुन ते दिनांक २४.१२.२०२१ रोजी दुपारी १६:०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत पोलीस भरती नियंत्रण कक्ष, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड येथे येऊन लेखी स्वरुपात अथवा www.pcpcpro2018@gmail.com या ईमेलवर आक्षेप नोंदवावा. त्या वेळेनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**(मा. अपर पोलीस आयुक्त तथा पोलीस भरती निवड मंडळ अध्यक्ष यांचे मान्यतेने)**

(डॉ. काकासाहेब डोळे)
पोलीस उप आयुक्त,(मुख्यालय)
पिंपरी चिंचवड